१७/०२/२०२५

प्रती,

मा. चंद्रशेखर बावनकुळे
अध्यक्ष,
महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ संयुक्त निवड समीती
मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**विषय : महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ विषयी नागरी समाज समूहांचे आक्षेप, मते आणि सूचना .**

महोदय,

आम्ही खाली सह्या करणाऱ्या नागरी समाज समूह, नियोजित महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ (यापुढे “विधेयक”) जे १८ डिसेंबर २०२४ रोजी राज्य विधानसभेत पुन्हा सादर करण्यात आले त्यातिल संशयास्पद गैरसमजांवर कठोर आक्षेप नोंदवत आहोत.

२१ सदस्यिय संयुक्त निवड समीतीचे अध्यक्ष म्हणुन आपल्या समीतीला संभाव्य प्रभावीतांची मते जाणुन घेऊन येत्या फेब्रुवारी मार्च २०२५ महिन्यात होऊ घातलेल्या अधिवेशनात अहवाल सादर करावयाचा आहे. महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाला ३ मार्च २०२५ रोजी सुरुवात होत असल्याने महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ च्या परिणामी राज्यातिल नागरी स्वातंत्र्याबाबत आम्ही चिंतित आहोत. विशेषत:, नागरीकांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटित होऊन एकत्र येण्याच्या, शांततापुर्वक विरोध करण्याच्या आणि खाजगी जीवनाच्या अधिकारांवर होणाऱ्या संभावित दुष्परीणामांमुळे आम्ही खुप चिंतित आहोत.

सुरुवातीला आम्ही सांगु इंच्छितो की, महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ हे महाराष्ट्र विधानसभेत ११ जुलै २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस (ज्यांच्याकडे गृह आणि विधी व न्याय मंत्रालये होती) यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातिल सरकारच्या माध्यमातुन सादर केले होते. विधानसभेची मुदत संपल्याने विधेयक रद्द झाले होते.

परंतु महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ जे आता पुन्हा सादर केले जात आहे ते सार्वजनिक विचार विनिमय व सुनावणी द्वारे सार्वजनिक छिननीसाठी सार्वजनिक करण्यात आलेले नाही. ते सार्वजनिक न करता संयुक्त निवड समीतीकडे पाठवन्यात आले आहे, ज्याचे आपण अध्यक्ष आहात. आम्ही या अपारदर्शक प्रक्रीयेला तिव्र हरकत नोंदवत आहोत. अशा प्रकारच्या महत्वपुर्ण विधेयकावर सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक आहे कारण ते महाराष्ट्रातिल सर्व नागरिकांच्या नागरी स्वातंत्र्याला प्रभावित करते.

या पार्श्वभूमीवर आम्ही या विधेयकावर आमची मते, सुचना व आक्षेप आपल्या अहवालाला अंतिम रुप देण्यापुर्वी छाननी व दखल घेण्याकरीता आपल्या निदर्शनास आणुन देत आहोत.

१. डिसेंबर २०२४ मध्ये सादर केलेले विधेयक अधिकृतरित्या सार्वजनिक न केले गेल्याने आम्ही आमची मते, सुचना व आक्षेप हे पुर्वी सादर केलेल्या महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ मधिल तरतुदींच्या आधारे करित आहोत. जर डिसेंबर २०२४ मध्ये सादर केलेले विधेयक हे सुधारित असेल तर ते तात्काळ सार्वजनिक करुन त्याची प्रत आम्हाला देण्यात यावी जेणेकरुन आम्हाला इतर सुचना मांडण्याची संधी मिळु शकेल.

२. आपल्या समीतीसमोर छाननीस आलेले विधेयक सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस म्हणाले होते की, या विधेयकाने ग्रामिण नक्षलवाद आणि त्यांच्या शहरी जनसंघटना "ज्या देश आणि देशाच्या संस्थांविषयी अविश्वास निर्माण करण्याचे काम करतात" त्यांच्याशी मुकाबला करता येईल. आम्ही अशा ढोबळ वक्तव्याविषयी आमची तिव्र नाराजी व्यक्त करतो. वास्तवात "अविश्वास" शब्दाचा अर्थ सापेक्ष आहे त्याची कोणतीही कायदेशिर व्याख्या नाही. त्याचबरोबर सरकारी धोरणांची विधायक टिका किंवा संस्थांकडून जबाबदारीची मागणी करित जे कृतीशील नागरिक आणि मानवाधिकार कार्यकर्ते आपल्या सांविधानिक अधिकार व कर्तव्याचे पालन करित असतात त्यांच्यावर "अविश्वास" चा शिक्का मारुन त्याचा विरोधक व न्याय मागणाऱ्यांच्या  विरोधात शस्त्रासारखा वापर केला जाऊ शकतो. त्याचबरोबर जरी नागरिकांमध्ये कोणताही "अविश्वास" असला तर सरकारची ही जबाबदारी आहे की असा "अविश्वास" दूर करणे, ना की नागरिकांच्या चिंता करण्याला गुन्हा ठरवणे. आम्हाला भिती वाटते की "नक्षलवादाशी" मुकाबला करण्याच्या नावाखाली या विधेयकाचा वापर सरकारी धोरण आणि कोणत्याही गैरकृत्यावर विधायक विरोध दर्शविणाऱ्या नागरीकांविरोधात केला जाईल. खरंतर असा कायदा, विरोध करणारे नागरिक, मानवाधिकार रक्षक आणि राजकिय विरोधकांना गुन्हेगार ठरविण्यास सहायक ठरेल. त्यामुळे या कायद्याचा मसुदा हा केवळ असांविधानिकच नसुन खाली दिलेल्या कारणांनुसार समस्याग्रस्त आहे आणि तो आणण्यामागची कारणे वाईट हेतुने प्रेरित असुन त्याचा गैरवापर संभव आहे.

३. पोटकलम २(फ) : विधेयकाचा उद्देश्य "व्यक्ती आणि संघटनांच्या बेकायदेशीर कारवायांचा अधिक प्रभावी बंदोबस्त करणे". या शब्दाची व्याख्या ढोबळ आणि खुप व्यापक आहे. त्यात म्हटले आहे की “बेकायदेशीर कृती” म्हणजे " कोणत्याही व्यक्ती वा संघटनेने केलेली कृती, मग ती प्रत्यक्ष कृती असो, भाषण, लेखन किंवा चिन्ह किंवा प्रातिनिधिक दृश्य किंवा इतर. याचा अर्थ कोणत्याही प्रकारची अभिव्यक्ती होते. भाषण, शब्द, ऑनलाइन संदेश, लेख, कलाकृती, निदर्शने यांचा यात समावेश होतो. इतकेच काय तर एखाद्या व्यक्ती वा संघटनेने पाठिंबा किंवा सहमती व्यक्त करणे ही सुद्धा बेकायदेशीर कृती ठरते. त्यामुळे संविधानाच्या अनुच्छेद १९ मध्ये सुरक्षित केलेले अधिकार ज्यामध्ये भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, एकत्र जमण्याचा व संघटित होण्याचा अधिकार, पत्रकारिता स्वातंत्र्य, आकादमिक स्वातंत्र्य इत्यादींना कात्री लावली जाऊ शकते. हे पुर्णपणे धोकादायक असुन याचा संभाव्य दुरुपयोग हा पत्रकार, लेखक, चित्रपट निर्माते, कलाकार आणि कोणतेही नागरिक जे कोणत्याही प्रकारे सरकारशी असहमती ठेवतात वा सरकारवर टिका करतात त्यांच्या विरोधात केला जाऊ शकतो.

४. पुन्हा "बेकायदेशीर कृती" च्या व्याख्येत अशी 'कृती' ज्यामुळे कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांततेस धोका किंवा डोकेदुखी ठरु शकेल आणि स्थापित कायदा व संस्थांप्रती असहकार पेरणे व प्रोत्साहित करणे येते. हे पुन्हा ढोबळ आणि अस्पष्ट असुन याचा वापर कोणत्याही कारणासाठी न्याय्य व शांततापुर्वक विरोधाला दाबण्यासाठी केला जाऊ शकतो. सरकारी धोरण व कायद्यांना शांततापुर्ण आक्षेप नोंदवणाऱ्या नागरीकांच्या

अधिकाराला धोकादायक समजले जाऊन अशा आक्षेपांना व्यक्त करणे वा विरोध प्रदर्शन करणे हे या दमनकारी तरतुदीने हिरावून घेतले जाऊ शकते.

५. इतर तरतुदींमध्ये "बेकायदेशीर कृती" चा संबंध हिंसा व गुन्हेगारी शक्तींचा वापर याच्याशी आहे. पण अशा कृतीचा बंदोबस्त अतीशय कठोर पद्धतीने अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांनुसार केला जातो तसेच भारतीय न्याय संहितेतही तशी तरतूद आहे. त्यासाठी वेगळ्या कायद्याची गरज नाही.

६. पोटकलम २(ड) : सदर विधेयक "संघटना" या शब्दाची खुप व्यापक व्याख्या करते. यात कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाचा समुच्चय ज्याला कोणतेही विशिष्ट नाव असो वा नसो आणि कोणत्याही कायद्यानुसार नोंदणीकृत असो वा नसो किंवा कोणत्याही लिखित संवीधानानुसार संचालित असो वा नसो अशी व्याख्या केलेली आहे. हे कोणत्याही व्यक्तीसमुहांच्या कोणत्याही कारणासाठी एकत्र येण्याच्या प्रक्रियेची जाणिवपुर्वक भयानक गल्लत करणे होय. अगदी निरुपद्रवी आणि पुर्णपणे अनौपचारिक पुस्तक क्लब, सांस्कृतिक गट, नागरी समस्यांवर काम करणाऱ्या नागरिकांचे एएलएम (ॲडव्हांस लोकॅलीटी मॅनेजमेंट) सारखे मंच हे सर्व या लवचिक व्याख्येत मोडतिल. आणि सरकारला अडचणीच्या ठरणाऱ्या कृतींवर त्यांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. भारतीय संविधानाचे कलम १९(१)(क) नागरिकांना गट, संघटना, सहकारी संस्था बनविण्याच्या अधीकाराची शाश्वते देते. आम्ही असे मानतो की या व्यापक व्याख्येचा छुपा उद्देश्य नागरीकांनी कोणत्याही कारणासाठी औपचारिक वा अनौपचारिक दृष्ट्या एकत्र येऊन संघटित होण्याच्या कृतीला हेरणे, त्यावर बारीक लक्ष्य ठेवणे आणि संभाव्या गुन्हेगारी ठरविण्याचा आहे.

७. पोटकलम २(ग) : "बेकायदेशीर संघटना" ची व्याख्या कोणतीही संघटना जी "बेकायदेशीर कृती" मध्ये कोणत्याही माध्यम वा तंत्रज्ञान किंवा इतर प्रकारे सामिल आहे किंवा प्रवृत्त करते किंवा सहकार्य करते किंवा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन देते अशी केलेली आहे. संघटनेची व्याख्या बेकायदेशीर कृती बरोबर एकत्रित पाहिल्यास हे स्पष्ट होते की कोणत्याही प्रश्नावर आवाज उठवणे बेकायदेशीर मानले जाईल.

८. पोटकलम ३(१ आणि २) : सदर विधेयकात पुर्णपणे अपारदर्शक तरतुदींचा समावेश केलेला आहे ज्यामुळे महाराष्ट्र सरकार कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर ठरवू शकेल. सरकार सरकारी गॅझेटमध्ये नोटिस जारी करु शकते. पण हे अतीशय धोकादायक आहे कारण की ही पुर्णत: अपारदर्शक प्रक्रीया असेल ज्याची कोणतीही पडताळणी होणार नाही. कोणत्याही संघटनेविरोधात अशी नोटिस जारी करण्यापुर्वी कोणतीही सुनावणी करण्याची तरतुद नाही. खरे पाहता एखाद्या संघटनेला बेकायदेशीर ठरवीण्यासाठी सरकारला तशी गरज वाटणेच पुरेसे आहे आणि जनहिताच्या नावाखाली त्याची कारणे गोपनिय ठेवत जाहिर न करणे हे भयंकर अपारदर्शक असुन याचा खुलेआम दुरुपयोग होणे संभव आहे.

९. कोणत्याही व्यक्ती वा समुहाच्या कृती बेकायदेशिर ठरवताना सरकारला कोणताही पुरावा देण्याचे बंधन नाही. थोडक्यात सदर विधेयक सरकारच्या हाती शक्ती प्रदान करते की ते कोणत्याही व्यक्ती वा समुह जे त्यांना धोकादायक वाटतात त्यांच्या सर्व कृतींना (अहिंसक कृती, भाषण व संपर्क) बेकायदेशीर ठरवुन त्यावर निर्बंध लादु शकते. आणि अशा संघटनेशी संबंधित काही वा सर्व व्यक्तींना दंडित करु शकते. त्याचबरोबर ढोबळ शब्दांचा गैरवापर हा पुर्णपणे काल्पनिक संघटनांना जन्म दिला जाऊ शकतो तो ही केवळ व्यक्तींच्या वा गटांच्या समान उद्देश्य वा समान

विचारधारेच्या आधारे. त्यानुसार आरोप सिद्ध करु शकणाऱ्या कोणत्याही पुराव्याशिवाय अशा व्यक्ती संबंधित आहेत म्हणुन त्यांच्या विरोधात कारवाई केली जाऊ शकते.

१०. पोटकलम ३(५) : त्याचबरोबर सरकार एखाद्या संघटनेला एका वेळी एक वर्षासाठी बेकायदेशिर घोषित करु शकते आणि अनिश्चित काळासाठी एकेक वर्षासाठी वाढवत नेऊ शकते. जनहिताचा मुद्दा पुढे करुन त्याची कारणे गोपनिय राखु शकते.

११. पोटकलम १९(१-२) : सरद विधयक जिल्हा दंडाधिकारी किंवा पोलिस आयुक्त किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला अशा शक्ती प्रदान करते की ते कोणत्याही वस्ती वा इमारत जीचा वापर त्यांच्यामते "बेकायदेशिर कृती" साठी केला जातो तिला चिन्हित (नोटीफाय) करुन तिचा ताबा घेऊ शकतात, तेथिल सर्व साहित्य जप्त करु शकतात आणि तेथिल लोकांना विस्थापित करु शकतात. कोणतीही वस्ती वा वास्तुला नोटिफाय (चिन्हित) करण्यापुर्वी कोणत्याही सुनावणीची संधी दिली जाणार नाही. उलट चिन्हित करणे, छापा टाकणे, आणि चिन्हित केलेल्या वास्तुविषयी पिडित व्यक्तीला वा संघटनेला आपले गाऱ्हाणे मांडण्याचा हक्क नाकारत, तिचा ताबा घेण्याची शक्ती सरकारला देण्यात आली आहे. चल संपत्ती (पैसा, रोखे आणि चिन्हित जागेत सापडलेल्या इतर वस्तु व संपत्ती) याचा ताबा घेण्याचे आणि वस्तु जप्त करुन जमा करण्याची अनियंत्रित शक्ती सरकारकडे देण्यात आली आहे. त्याचबरोबर अशा जब्त केलेल्या संपत्ती विषयीची अपिलही सरकारसमोरच करावी लागणार आहे. आम्ही असे मानतो की या तरतुदी नागरीकांचा छळ करणे, त्यांना बेघर करुन दरिद्री करण्यासाठी आहेत. वास्तवात सर्वोच्च न्यायालयाने "बुलडोजर अन्याय" द्वारे आरोपींविरोधात अधिकाऱ्यांना खुली सुट देत दंडात्मक कारवाई विरोधात दिशानिर्देश दिलेले आहेत. परंतु विधेयकातिल छळ करणाऱ्या आणि दमनकारी तरतुदी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांची पायमल्ली ठरतात.

१२. पोटकलम (१-४) आणि १०(१-८) : विधेयकामध्ये आरोपींची संपत्ती, पैसा, रोखे, जनावरे आणि नाशवंत वस्तु (कृषीवस्तु) नष्ट करण्याच्या तरतुदी आहेत. यातुन आरोपिंना आर्थिक व वित्तिय दृष्ट्या पंगु बनविण्याचा प्रयत्न आहे. हे मुळातच अन्यायकारक आहे विशेषत: आदिवासी आणि परिघावरील लोकांसाठी, जे अशा आरोपातुन स्वत:चा बचाव करु शकण्यास असमर्थ ठरतिल.

१३. पोटकलम ५ (१ आणि २) व ६(१-५) : सदर विधेयकात कोणत्याही संघटनेला "बेकायदेशीर" घोषित करण्याच्या पुनरावलोकनासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्याची तरतुद आहे. परंतु सदर प्रक्रिया ही अशा पुनरावलोकनाला धुळफेक ठरवते. पहिले असे की पुनरावलोकन मंडळाची उभारणी सरकारच करणार. त्यात उच्च न्यायालयाचे न्यायाधिश किंवा उच्च न्यायालयाची न्यायाधिश म्हणुन नेमली जाऊ शकते अशा व्यक्तींना सरकार आपल्या कृतीच्या पुनरावलोकनासाठी नेमणार. आम्हाला भिती वाटते की सल्लागार मंडळामध्ये सरकार धार्जिणे लोक नेमले जातिल व स्वतंत्र कायद्याचे जाणकार आणि नागरी समाजाच्या सदस्यांना वगळले जाण्याची शक्यता आहे. दुसरे असे की सरकार नोटीफीकेशन जारी केल्याच्या सहा आठवड्यात सल्लागार मंडळाला माहीती देऊ शकते. पण त्यातही एक अट अशी की सरकार कोणतेही "तथ्य" जाहिर करणे जनहिताच्या विरुद्ध सांगुन गोपनिय ठेऊ शकते. संबंधित संघटनेला आपले म्हणने सरकारकडे मांडण्यासाठी केवळ १५ दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. चौथे असे की ही प्रक्रिया इतकी क्लिष्ट केली आहे की सल्लागार मंडळासमोर व्यक्तीगत सुनावणीमध्ये केवळ

त्या संघटनेचा अधिकृत पदाधिकारिच प्रतिनिधित्व करु शकतो. त्यामुळे आधिच बेकायदेशीर ठरविलेल्या संघटनेचा अधीकृत सदस्य म्हणुन अटक होण्याच्या भितीने कोणी आपले म्हणने मांडण्यासाठी पुढेच येणार नाही.

१४. सदर विधेयक हे सरकारला चौकशी आदेश देण्याचे अमर्याद अधीकार देते. हे विधेयक वारंटप्रमाणे काम करेल. त्यामुळे कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला कोणत्याही व्यक्तीच्या घरात/कार्यालयात/मिळकतित घुसुन शोध/तपास करण्याची शक्ती प्रदान करते. यातून अशी भिती व्यक्त केली जाते की, व्यक्तींना केवळ विवादित समजली जाणारी पुस्तकं बाळगल्याच्या बेकायदेशीर कृतीचे आरोपी बनवले जाऊ शकते. हे व्यक्तींच्या खाजगी आयुष्याच्या मुलभुत अधिकाराचे उल्लंघन करते.

१५. पोटकलम ८(१-४) १६(१-२) : विधेयकामध्ये विविध गुन्ह्यांसाठी दंडांची यादी दिलेली आहे आणि त्यांची व्याख्या विविध गुन्ह्यांसाठी अपारदर्शकपणे २-७ वर्ष तुरुंगवास ठरवला आहे. सर्व गुन्हे हे दखलपात्र व अजामिनपात्र आहेत. केवळ बेकायदेशीर संघटनेचा सदस्य असणे हे ३ वर्ष तुरुंगवासाच्या शिक्षेसाठी पुरेसे आहे. एखादी व्यक्ती सदस्य नाही पण वर्गणी देते किंवा मिळवुन देते किंवा बेकायदेशिर संघटनेच्या सदस्याला आसरा देत असल्यास २ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा आहे.

१६. या दरम्यान विधेयकाचे नियम तयार करण्यात आले आहेत. परंतु प्रस्तावित नियम सार्वजनिक केलेले नाहीत त्यामुळे प्रस्तावित कायद्याच्या अंमलबजावणी विषयी प्रश्न उपस्थित होतात.

१७. सदर विधेयकाच्या विषयवस्तु आणि कारणांच्या विधानानुसार छत्तिसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि ओडीशा राज्यांनी अशाच प्रकारचे "बेकायदेशीर कृती" प्रतीबंधक कायदे तयार करुन ४८ जनसंघटनांवर बंदी घातली आहे. पुढे सरकारचे म्हणणे आहे की अशा बेकायदेशीर कृतींना प्रभावी कायदेशीर मार्गाने प्रतीबंधित केले पाहिजे". त्याचवेळी अस्तित्वात असलेले कायदे नक्षलवादाला आळा घालण्यास अपुरे व अकार्यक्षम आहेत मानने विचित्र आणि भ्रामक आहे.

१८. दुर्दैवाने विविध सरकारे आणि मंत्र्यांच्या मोठ मोठ्या घोषणांनंतरही असे कायदे कायदाविरोधी कृतींच्या प्रभावी नियंत्रण करण्यात असमर्थ ठरले आहेत आणि त्यांचा तो उद्देशही नव्हता. उलट अनेक पत्रकार आणि मानवाधिकार संघटनांच्या अहवालांनी नोंद केली आहे की अशा भयानक कायद्यांचा कसा दुरुपयोग केला जातो. छत्तिसगड जनसुरक्षा अधिनियम २००५ (छत्तिसगड कायदा) आणि आंध्र प्रदेश विशेष सार्वजनिक सुरक्षा कायदा १९९२ ने सरकारी कृतीला विरोध करणाऱ्या पत्रकार, वकिल, पर्यावरण रक्षक, नागरीक कार्यकर्ते आणि विरोध प्रदर्शन करणाऱ्या आदीवासींना निशाणा बनविण्यासाठी करण्यात आले आहे. छत्तिसगड कायद्याला सांविधानिक आव्हान देणारी याचीका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. जबाबदार नागरिक समाज संघटना म्हणुन आम्ही अशा दमनकारी विधेयकांविषयी चिंतित आहोत की महाराष्ट्र राज्याच्या समृद्ध आणि सशक्त सामाजिक आणि राजकिय जीवनात राज्याच्या नागरिकांच्या न्याय्य अभिव्यक्ती विरोधात या प्रस्तावित कायद्याचा गैरवापर होऊ शकतो.

महोदय, सामाजिक सुधारणांची दिर्घ आणि दैदिप्यमान इतिहास लाभलेले महाराष्ट्र राज्य स्वातंत्र्यापुर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही लोकशाहीवादी राजकिय चळवळींच्या अग्रस्थानी राहीलेले आहे. महाराष्ट्रातिल जनतेने स्वातंत्र्यासाठी खुप कष्ट आणि बलिदान दिले आहे. आम्ही मानतो की हे विधेयक राज्याची ऐतीहासिक परंपरा व लोकशाही मुल्यांना ध्वस्त करेल.

थोडक्यात, आम्ही मानतो की महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक मुळातच २०२४ असांविधानिक , अतीविस्तृत, अनियंत्रित असुन त्याचा गैरवापर होण्याचीच शक्यता जास्त आहे. आम्ही आपल्या निवड समीतीला विनंती करतो की आपण आम्हा नागरी समाजाचे आक्षेप आपल्या समक्ष मांडण्यासाठी प्रत्यक्ष भेट द्यावी. आम्ही आपणास व आपल्या समीतीच्या सदस्यांना विनंती करतो की आपण हे विधेयक स्पष्टपणे नाकारावे आणि महाराष्ट्र राज्याच्या लोकशाही मुल्य आणि प्रगतीशील चारित्र्याशी ठाम रहावे.

स्वाक्षरी:

१. पीपल’स यूनियन फॉर सिविल लिबर्टीज.

२. नारी अत्याचार विरोधी मंच.

३. हसरत ए जिंदगी मामुली

४. पाणी हक्क समिति

५. जन स्वास्थ्य अभियान, मुंबई

६. जस्टिस कोलिशन ऑफ रीलीजियस – पश्चिम भारत

७. फ्री स्पीच कलेक्टिव

८. सिटिजन फॉर द कॉनस्टीटयूशन

९. ह्यूमन राइट्स डिफेंडर्स अलर्ट – भारत

१०. जन हक्क संघर्ष समिति – मुंबई

११. पीपल’स वॉच

१२. सेंटर फॉर प्रोमोटिंग डेमोक्रसी

१३. फातिमा शेख स्टडी सेंटर

१४. लोकतांत्रिक कामगार यूनियन

१५. अनहद

१६. सेंटर ऑफ इंडियन ट्रेड यूनियनस, महाराष्ट्र

१७. इंडियन मुस्लिम फॉर सेकुलर डेमोक्रसी

१८. लोकशाही जागर समिति

१९. सिटिजन फॉर जस्टिस अँड पीस

२०. कष्टकरी संघटना

२१. बेबाक कलेक्टिव

२२. सीडीआरए

२३. अग्रणी सोशल फाऊंडेशन

२४. महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिति

२५. महाराष्ट्र हॉकर फेडरेशन

२६. महात्मा गांधी फाऊंडेशन

२७. ऑल इंडिया लॉयरस असोसिएशन फॉर जस्टिस

२८. श्रमिक जनता संघ ठाणे

२९. लेबर स्टडी अँड रिसर्च सेंटर, वर्धा

३०. नॅशनल आलयन्स ऑफ पीपलस मुव्हमेंटस

३१. ऑल इंडिया हॉकर फोरम

३२. कामगार एकता यूनियन

३३. सेंटर फॉर फिनानशियल अकाऊंटेबिलिटी

३४. कलेक्टिव, मुंबई

३५. पाकिस्तान इंडिया पीपलस फॉर पीस अँड डेमोक्रसी, पुणे

३६. मायनॉरिटीज वॉइस, पुणे

३७. फ्रायडेस फॉर फ्युचर, मुंबई

३८. न्यू सोशलिस्ट ऑल्टरनेटिव, पुणे

३९. अॅटलस मुव्हमेंट इंडिया

४०. युवा भारत, महाराष्ट्र

४१. आरोग्य सेना, पुणे

४२. नॅशनल आलयन्स फॉर जस्टिस अकाऊंटेबिलिटी अँड राइट्स

४३. जागृत कष्टकरी संघटना, कर्जत

४४. बांगला मानबाधिकार सुरक्षा मंच

४५. इंडियन ख्रिश्चन विमेनस मुव्हमेंट

४६. आंबेडकराइट इंडियन मिशन

४७. आय सी ए एन, वर्धा

४८. विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र

४९. बॉम्बे कॅथॉलिक सभा

५०. सिटिमेकर मिशन इंटरनॅशनल

५१. घर हक्क संघर्ष समिति, नवी मुंबई

५२. मेळघाट जन अधिकार आंदोलन

५३. महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडीशनल फिश वर्कर्स यूनियन

५४. इंडियन सोशल ऍक्शन  फोरम,, नागपुर

५५. ऑल इंडिया किसान सभा आणि इतर.

५६. राष्ट्र सेवा दल , पुणे

५७. शहीद भगतसिंग हौकर्स युनिअन , मुंबई

५८. निवारा बांधकाम कामगार संघटना , सांगली

५९. महाराष्ट्र आशा गटप्रवर्तक व आरोग्य कर्मचारी संघटना ,सांगली

६०. महाराष्ट्र लाल बावटा जनरल कामगार युनिअन , सांगली

६१. पुरोगामी झोपडपट्टी संघटना , सांगली

६२. असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईट्स

६३. संविधान संवर्धन समिती

६४. राष्ट्रीय एकता समिती

६५. आदिवासी हक्क संवर्धन समिती

६६. सर्वहारा जन आंदोलन , रायगड

६७. लोक संघर्ष मोर्चा , जळगाव

६८. पारंपरिक मच्छीमार सामाजिक कृती समिती , उरण

६९. शिवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटन ,उरण

७०. शिवा कोळीवाडा सामाजिक ग्राम विकास मंडळ ,उरण

७१. श्री हनुमान कोळीवाडा मच्छीमार व्ही के एस संस्था मर्यादित ,उरण

७२. गौहान कोळीवाडा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादित ,पनवेल

७३. स्वराज अभियान , महाराष्ट्र

७४. विरोधी महिला मंच

७५. वेश्या अन्याय मुक्ती परिषद

७६. मुस्कान संस्था

७७. शेतकरी शेत मजूर पंचायत , महाराष्ट्र

७८. मराठवाडा लेबर युनिअन

७९. अंतर भारती, पुणे

कॉपी : 1. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फड्नाविस,

गृहमंत्री, महाराष्ट्र गृह विभाग,

मंत्रालय, मुंबई – ४०००३२

2. समितीचे इतर सदस्य